सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २२२ | मंगळवार, दि. ०५ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन


श्री. संजय बाविस्कर
रेल्वे विभाग


श्री. श्याम पाटील
माजी नगरसेवक


श्री. हर्षल पाटील
शिक्षक


श्री. विकास पाटील
अमळनेर


श्री. कुंदन पाटील
जेष्ठ उपसंपादक, लोकमत


श्री. विनोद जाधव
माजी पं. स. सदस्य



श्री. भटू वाघ
डांगर


श्री. ई. के. महाले
शिक्षक


श्री. योगेश पवार
अमळनेर

# कोकणातील सर्व आंबा उत्पादकांना एकटा माणूस पडतोय भारी!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भारतातील सर्वात मोठ्या आंब्याच्या बागेचा मालक कोकणातील सर्व आंबा उत्पादकांना हा एकटा टक्कर देतो. याच्या बागेतील आंबा मोठ्या प्रमाणात निर्यात केला जातो. हा व्यक्ती जगातील पहिल्या नंबरचा आंबा निर्यातदार आहे. भारतातील विविध राज्यात आंब्याचे उत्पादन घेतले जाते. वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या प्रकारचे आंबे पिकवले जातात. महाराष्ट्रातील कोकणचा हापूस आंबा जगप्रसिद्ध आहे. कोकणच्या हापूसला परदेशात मोठी मागणी आहे. मोठ्या प्रमाणात कोकणच्या हापूसची निर्यात होते. पण, तुम्हाला माहित आहे का एक व्यक्ती आहे जो कोकणातील सर्व आंबा उत्पादकांना एकटा टक्कर देतो. हा व्यक्ती भारतातील सर्वात मोठ्या आंब्याच्या बागेचा मालक आहे. इतकच नाही तर हा व्यक्ती जगातील पहिल्या नंबरचा आंबा निर्यातदार आहे. या व्यक्तीचे नाव जाणून शॉक व्हाल.भारत हा जगातील सर्वात मोठा आंबा उत्पादक देश आहे. जगातील ४० ते ४५ टक्के आंबा उत्पादनात भारतातच होते.



आंबा उत्पादनात भारताचे योगदान खूप मोठे आहे. भारतात वार्षाला अंदाजे २० ते २५ दशलक्ष टन आंबा उत्पादन होते. महाराष्ट्रातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगडमध्ये प्रामुख्याने हापूस आंब्याचे उत्पादन होते. महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरातसह, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात देखील केशर, दशहरा, लंगडा, तोतापुरी अशा विविध प्रकारच्या आंब्यांचे उत्पादन घेतले जाते. भारतातील सर्वात मोठ्या आंबाच्या बागेचा मालक असलेला व्यक्ती आपल्या बागेत या सर्व प्रकारच्या आंब्याचे उत्पादन घेतो आणि हा आंबा निर्यात करतो. भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती मुकेश अंबानी हे सर्वात मोठ्या आंब्याच्या बागेचे मालक आहेत. पेट्रोलियम, दूरसंचार आणि किरकोळ क्षेत्रांमध्ये पसरलेल्या आपल्या विशाल व्यावसायिक साम्राज्यासाठी ओळखले जाणारे मुकेश अंबानी यांनी कृषी क्षेत्रातही आश्चर्यकारक कामगिरी केली आहे. अंबानी यांची रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड ही जगातील सर्वात मोठी आंब्याची निर्यातदार कंपनी बनली आहे. इतकेच नव्हे, तर भारतातील सर्वात मोठी आंब्याची बागही रिलायन्सच्या मालकीची आहे.मुकेश अंबानी हे रिलायन्स इंडस्ट्रीजच्या माध्यमातून भारतातील सर्वात मोठ्या आंब्याच्या बागेचे मालक बनले आहेत. अंबानी यांची भारतातील ही सर्वात मोठी आंब्याची बाग धीरूभाई अंबानी लखीबाग अमराई नावाने ओळखली जाते. गुजरातच्या जामनगरमध्ये ही आंब्याची बाग आहे. ६०० एकरांवर पसरलेल्या या बागेत दीड लाखांहून अधिक आंब्याची झाडे आहेत.भारतातील या सर्वात मोठ्या आंबा बागेत अल्फान्सो आणि केसरसह २०० हून अधिक जातींच्या आंब्यांच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे. अंबानी यांची गुजरातमधील ही आंब्यांची बाग फक्त भारतातीलच नाही तर जगातील सर्वात मोठ्या आंबा बागांपैकी एक मानली जाते.अंबानी यांनी २९ वर्षांपूर्वी १९९७ मध्ये या बागेत वृक्ष लागवड सुरु केली.

(पान २ वर)

# ओव्हरलोडेड रेती-खडी डंपरांमुळे कॉलनी रस्ते उध्वस्त

## महात्मा फुले कॉलनीतील पूल खचला; नागरिकांची तातडीची दुरुस्तीची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पिंपळे रोडवरील महात्मा फुले कॉलनीत जाणाऱ्या पिंपळे नाल्यावरचा लहान पूल (ढापा) अवजड वाहनांच्या सततच्या वाहतुकीमुळे खचल्याची घटना समोर आली आहे. त्यामुळे कॉलनीतील नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.ढेकू रस्ता बंद असल्यामुळे त्या मार्गावरील अवजड वाहने सध्या पिंपळे रस्त्याचा वापर करत आहेत. या मार्गावरून ओव्हरलोडेड रेती व खडीचे डंपर मोठ्या वेगाने व बिनधास्तपणे धावत असल्याने रस्त्याची दुरवस्था झाली आहे.





*अमळनेर : पिंपळे नाल्यावरचा लहान पूल अवजड वाहनांच्या सततच्या वाहतुकीमुळे खचला आहे. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)*

परिणामी, या वाढत्या वाहतुकीचा फटका महात्मा फुले कॉलनीतील रस्ते व पुलाला बसला आहे. मुळातच कमकुवत असलेला हा पूल अवजड वाहनांच्या ताणामुळे अखेर ढासळला आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कोणतीही मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.ओव्हरलोडेड वाहनांवर प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

त्यामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेऊन अशा वाहनांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच, अमळनेर येथे तुटलेल्या पुलाची तात्काळ संबंधित विभागाकडून दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे. यासंदर्भात कॉलनीतील नागरिक लवकरच प्रशासनाला निवेदन देणार असून, प्रशासनाने निवेदनाची वाट न पाहता त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जळगाव जिल्ह्यात पुढील ३ दिवस अवकाळी पावसाची शक्यता, हवामान विभागाचा अंदाज.!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : राज्यातील हवामानात पुन्हा एकदा मोठा बदल होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा इशारा समोर आला आहे. जळगाव जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात ४ ते ७ मे दरम्यान तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची दाट शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. त्यामुळे ऐन काढणीच्या हंगामात शेतकऱ्यांनी अधिक सतर्क राहण्याची गरज निर्माण झाली आहे.

भारतीय हवामान विभागाच्या कुलाबा, मुंबई केंद्राकडून शेतकऱ्यांसाठी विशेष हवामान बुलेटिन जारी करण्यात आले आहे. या बुलेटिनमध्ये महाराष्ट्रासह गोवा राज्यासाठी पुढील काही दिवसांचा सविस्तर अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यानुसार ४ मेपासून बहुतांश भागात हवामान कोरडे राहण्याची शक्यता असली तरी काही ठिकाणी अचानक बदल होऊ शकतो, असा इशाराही देण्यात आला आहे.जळगाव जिल्ह्यासाठी विशेषतः सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. ४ ते ७ मे दरम्यान तुरळक ठिकाणी वादळी वातावरण तयार होऊ शकते. अचानक येणारे वारे, विजांचा कडकडाट आणि संभाव्य पावसामुळे शेती पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी आधीच आवश्यक ती खबरदारी घेणे गरजेचे आहे.

सध्या राज्यात रब्बी हंगामातील पिकांची काढणी सुरू आहे. अशा परिस्थितीत काढणी केलेली पिके उघड्यावर ठेवणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा योग्य प्रकारे झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे आणि संभाव्य गारपिटीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

हा हवामानाचा इशारा केवळ अंदाज नसून शेतकऱ्यांसाठी सावध राहण्याची एक महत्त्वाची सूचना आहे. थोडीशी काळजी घेतल्यास मोठे आर्थिक नुकसान टाळता येऊ शकते. त्यामुळे पुढील काही दिवस हवामानाच्या बदलत्या परिस्थितीकडे लक्ष ठेवूनच शेतीची कामे नियोजित करणे आवश्यक आहे.




# भूमी सुपोषण रथाचा झंझावात १५४ गावांना भेटी देऊन समारोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : वाढता रासायनिक खतांचा वापर आणि त्यामुळे खालावलेली जमिनीची सुपीकता यावर मात करण्यासाठी अमळनेर तालुक्यात भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियानाने चळवळ उभी केली आहे. आपल्या अन्नदात्या भूमीला पुन्हा एकदा सुजलाम-सुफलाम करण्यासाठी आणि शेतीला तिचे हरवलेले गतवैभव मिळवून देण्यासाठी हे अभियान आता तालुक्यातील घराघरांत पोहोचले आहे.११ एप्रिलपासून अभियानांतर्गत एक विशेष जनजागर रथ तयार करण्यात आला या रथाने ३ कृषी मंडळांतील तब्बल १५४ गावांना भेटी देऊन रविवार दि.३ रोजी सायंकाळी दरेगाव,दरेगाव हिंगोणे बु या गावांमध्ये रथाचे जोरदार स्वागत करण्यात आले. यानंतर समारोप करण्यात आला. गेली २२ दिवस भूमी सुपोषण रथाने १५४ गावांना भेटी दिल्या. श्रद्धेतून समृद्धीकडे केवळ माहिती न देता, जमिनीशी असलेले आपले नाते अधिक घट्ट करण्यासाठी या मोहिमेत आध्यात्मिक जोडही देण्यात आली.

तालुक्यातील ६ प्रमुख गावांमध्ये अत्यंत भक्तीभावाने भूमीमाता पूजन सोहळा आयोजित केला. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे ही केवळ गरज नसून ते आपले कर्तव्य आहे, हा संदेश या पूजनाच्या माध्यमातून दिला गेला.रासायनिक शेतीचे मानवी आरोग्यावर आणि जमिनीवर होणारे दुष्परिणाम, तसेच जैविक (सेंद्रिय) शेतीचे दीर्घकालीन फायदे सांगणारी माहितीपत्रके प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवली गेली.या मोहिमेला महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे तांत्रिक आणि मोलाचे सहकार्य लाभले. अक्षय कृषी परिवार आणि मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने हे अभियान राबवले गेले.

# विमानसेवा पुन्हा रखडली; जिल्हावासियांची निराशा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : जळगावकरांसाठी महत्त्वाची मानली जाणारी जळगाव-दिल्ली विमानसेवा पुन्हा एकदा स्थगित करण्यात आली आहे. अलायन्स एअर कंपनीकडून सुरू होणारी ही सेवा तांत्रिक अडचणींमुळे ऐनवेळी रद्द करण्यात आल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.२ मेपासून सुरू होणारी जळगाव-दिल्ली (इंदूर मार्गे) ही विमानसेवा पुढील आदेश येईपर्यंत तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. विमानाच्या तांत्रिक तपासणीदरम्यान काही त्रुटी आढळल्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, सेवा सुरू होण्याच्या अगदी एक दिवस आधीच हा निर्णय जाहीर करण्यात आल्याने प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. याआधीही अलायन्स एअरच्या सेवांबाबत अनिश्चितता आणि ऐनवेळी बदल झाल्याचे प्रकार समोर आले होते.जळगाव-मुंबई विमानसेवेबाबतही यापूर्वी अशाच प्रकारे ऐनवेळी रद्द करण्यात आल्याने प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. वारंवार होणाऱ्या या बदलांमुळे विमान कंपनीच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.अलायन्स एअर कंपनीच्या म्हणण्यानुसार, आवश्यक दुरुस्ती आणि तपासणीनंतरच सेवा पुन्हा सुरू केली जाईल. मात्र, याबाबत निश्चित तारीख जाहीर करण्यात आलेली नाही.

# लग्नाचे निमंत्रण न दिल्याने काका रुसले

## नवरदेवाच्या घराचा दरवाजा केला वेल्डिंग करून बंद



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एका नवरदेवाने आपल्या लग्नाचे आमंत्रण काकाला दिले नाही. याचा राग मनात धरून काकाने उचलले असे पाऊल, की सर्वजण अवाकच झाले. उत्तर प्रदेशातील जालौनमधून एक विचित्र घटना समोर आली आहे. जेव्हा एका काकाला त्याच्या भाच्याच्या लग्नाचे आमंत्रण दिले नाही तेव्हा तो संतापला. वधू-वरांचे स्वागत करण्यासाठी त्याने इतक्या फसव्या मार्गाचा अवलंब केला, की पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. वधूला निरोप देऊन जेव्हा नवरदेव घरी परतला तेव्हा त्याला घराचा दरवाजा वेल्डिंगने बंद केलेला आढळला. नंतर असे उघड झाले की हे कृत्य त्याच्याच काकाने केले होते. बऱ्याच प्रयत्नांनंतर दरवाजा उघडण्यात आला आणि वधूचे घरात स्वागत करण्यात आले. पण वरात दारात घेऊन आलेल्या नवरदेवाला मात्र दरवाजा चक्क वेल्डिंगने बंद केलेला पाहून चांगलाच झटका बसला.

ही घटना उत्तर प्रदेशातील जालौन कोतवाली भागातील नारो भास्कर गावात घडली. नारो भास्कर या गावातील रहिवासी असलेल्या मुहम्मद मजीद याचे लग्न होते. त्याने कौटुंबिक वादातून त्याचा काका मुहम्मद अझर याला लग्नाचे निमंत्रण दिले नव्हते. यामुळे संतापलेल्या काकाने नवरदेवाच्या घराचा मुख्य दरवाजा वेल्डिंग करून बंद केला. जेव्हा नवरदेव वधूसह आला तेव्हा ते दृश्य पाहून सर्वजण थक्क झाले.

काही वेळाने हे कृत्य रुसलेल्या काकांनीच केल्याचे लक्षात आल्यावर या घटनेची माहिती तत्काळ पोलिसांना देण्यात आली. पण घटनास्थळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला. पोलिसांच्या उपस्थित दरवाजाला वेल्डिंग केलेले तोडण्यात आले. यानंतरच वधूचा घरात प्रवेश झाला.



अभीष्टचिंतन

श्री. आबासो. विकास पाटील

(भगवती टी हाउस, अमळनेर)

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...

* शुभेच्छुक *

सौ. छाया बाळासाहेब पाटील (नगरसेविका) | श्री. बाळासाहेब पाटील (सामाजिक कार्यकर्ते)

## संपादकीय

# वैशाख वणवा...

महाराष्ट्रात वैशाख महिन्यातील उष्णतेच्या लाटेने जनजीवन हैराण झाले आहे. विदर्भात तापमान ४७ अंशांवर पोहोचले आहे. अनेक शहरांमध्ये ४० अंश सेल्सिअसवरील तापमान नित्याचे झाले आहे. उष्णतेमुळे देशात आजवर बऱ्याच जणांचा मृत्यू झाला असून, त्यात महाराष्ट्रातीलही काहींचा समावेश आहे. ऐन वैशाखातील उष्णतेच्या लाटेमध्ये चांद्यापासून ते बांद्यापर्यंत अवघा महाराष्ट्र भाजून निघत आहे. अकोला–अमरावती येथे तापमान ४७ अंशांवर पोहोचण्याच्या बेतात असून, अवघ्या विदर्भात पारा चाळिशीच्या वरच आहे. तुलनेने अन्य वेळी कमी उकाड्याच्या पुण्यासारख्या शहरांतही ४० अंश सेल्सियसचे तापमान नित्याचे ठरू पाहत आहे. मुंबई–कोकणासारख्या किनारी भागांत दमटपणामुळे अंगातून घामाच्या धारा वाहत आहेत; तर कोरड्या हवामानामुळे उर्वरित महाराष्ट्रात अंगाला बसणारे चटके असह्य झाले आहेत. उष्णतेचा फटका बसून देशात काही बळी गेले असून, त्यात राज्यातीलही काहींचा समावेश आहे. त्यामुळेच या काळात स्वतःची काळजी न घेतल्यास उन्हाळा जीवघेणा ठरू शकतो, याची जाणीव ठेवलेली बरी. उष्णतेची ही लाट महिनाअखेरपर्यंत राहणार असली, तरी संपूर्ण मे महिना आणि जूनमध्ये पावसाला दमदार सुरूवात होईपर्यंत, म्हणजे आणखी जवळपास दीड महिना कमी–अधिक फरकाने हीच स्थिती राहणार आहे. मॉन्सूनच्या आगमनाला उशीर झाला, तर परिस्थिती गंभीर होऊ शकते.

जगात सर्वांत उष्ण शहरांपैकी सर्वाधिक शहरे भारतामध्ये आहेत. यंदा उत्तर आणि मध्यपूर्व भारतामध्ये उष्णतेची लाट आली असून राजस्थान, गुजरात, पंजाब–हरियाणा, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि ओडिशा या राज्यांमध्ये त्याचा फटका बसत आहे. राज्यात विदर्भ–मराठवाड्यात उष्णतेची तीव्रता अधिक आहेच; सोबतच महाबळेश्वरसारख्या थंड हवेच्या ठिकाणीही पारा तीस अंशांच्या वरच दिसून येतो. शहरी आणि ग्रामीण अशा सर्वच भागांमध्ये आरोग्यापासून ते शेती–उद्योगांपर्यंत या उष्णतेचे भीषण परिणाम जाणवत आहेत. सरकारी अट्टाहासामुळे परीक्षेनंतरही सुरू असलेल्या शाळांच्या वेळा बदलण्याची वेळ बहुसंख्य शहरांमध्ये आली आहे. उष्माघात (सनस्ट्रोक), शरीरातील पाणी कमी होणे किंवा चक्कर येण्यासारख्या आरोग्याच्या प्रश्नांनी लहानथोर हैराण झाले असून, रुग्णालयांमधून उष्माघात कक्ष सुरू करण्याच्या सूचना करण्यात येत आहेत. जलस्त्रोत आटू लागले आहेत. गेल्या पंधरा दिवसांतच सुमारे सात टक्के पाणी कमी झाल्याने एप्रिलमध्येच पाणीटंचाई जाणवू लागली आहे. त्यातच यंदा 'एन निनो' परिणामामुळे मॉन्सूनही सरासरीपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. दुष्काळाची चाहूल लागल्याने जलाशयांतील पाणीसाठे पिण्यासाठी राखीव ठेवण्यात येत आहेत. त्यामुळे उन्हाळी पिके, फळबागा आणि चारा पिकांच्या उत्पादनात घट होण्याची भीती आहे. उकाड्याबरोबरच विजेचा लपंडाव सुरू झाल्याने ग्रामीण भागातील नागरिकांचे जिणे हैराण झाले आहे. पाणीटंचाईच्या भागांमध्ये टँकरची व्यवस्था, आरोग्यव्यवस्था आणि सुरळीत वीजपुरवठा या सर्व आघाड्यांवर यंत्रणांनी वेळीच नियोजन केले पाहिजे.

निसर्गावर मानवाने केलेले अतिक्रमण आणि अतिरेकी हस्तक्षेपामुळे उभे राहिलेले तापमानवाढीचे संकट, हे हवामानातील बदलांचा सर्वांत मोठा दृश्य परिणाम आहे. सन २०२४ हे या शतकातील सर्वाधिक उष्ण वर्ष ठरले. पुढील दोन वर्षेही जवळपास तेवढेच तापमान राहिले आहे. ग्रामीण–शहरी भागांमधील अनियंत्रित वृक्षतोड, शहरांमधील अतिरेकी काँक्रीटीकरण आणि जीवाश्म इंधनाचा वारेमाप वापर यांमुळे हवामानात बदल होत असून त्यामुळे अनियमित–कमी अधिक मॉन्सून, दुष्काळ–अतिवृष्टी किंवा गारपीट अशा संकटांची वारंवारिता वाढली आहे. विकासकामांसाठी हजारो झाडांवर कुऱ्हाड चालविण्यात आल्याने महाराष्ट्रातील बहुतांश भागांतील हरित आच्छादन साडेसोळा टक्के एवढेच राहिले आहे. राज्यातील सर्वच महापालिकांना अगदी गल्लीबोळांतील रस्तेही काँक्रीटचे करण्याची जणू चटक लागली आहे. या काँक्रीटीकरणामुळे शहरांतील तापमानात सुमारे दोन ते पाच अंशांनी वाढते आणि रात्रीसुद्धा ते वाढलेले राहते, असे आढळून आल्यावरही त्यातील 'अर्थपूर्ण' बाबींमुळे प्रशासन व लोकप्रतिनिधींचा त्यासाठीचा आग्रह, हे त्यामागील उघड गुपित आहे. बहुसंख्य शहरांमध्ये पाणी जमिनीत न मुरल्याने दरवर्षी पूरसदृश स्थिती निर्माण होते, हीसुद्धा काँक्रीटचीच किमया! सोबतच उद्योग आणि ऊर्जानिर्मितीसाठी कोळशाचा प्रचंड वापर, वाहनांसाठी वापरले जाणारे पेट्रोल–डिझेल यांचाही तापमानवाढीत मोठा वाटा आहे. नित्याच्या बनलेल्या या संकटावर मात करण्यासाठी हरित ऊर्जेचा अधिकाधिक वापर, शाश्वत शेती, पाण्याची बचत, शहर नियोजनात बदल आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार केला, तरच या तापल्या जीवांना भविष्यात थोडाफार थंडावा मिळू शकेल.

# उन्हाळ्यात एसीचे स्फोट का होतात? असे अपघात टाळण्यासाठी ही काळजी घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशभरात उष्णता वाढते आहे. अनेक भागात तापमान ४० ते ४५ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले आहे.दाट लोकवस्तीच्या शहरांमध्ये वाढती लोकसंख्या, ट्रॅफिकचा दबाव आणि प्रदूषणामुळे उष्णतेचा कहर वाढतच चालला आहे.अशा परिस्थितीत एअर कंडिशनरचा (एसी) वापर वाढला आहे.मात्र, त्याचबरोबर प्रचंड उष्णतेमुळे अनेकदा एअर कंडिशनरमध्ये (एसी) स्फोट होण्याच्या घटनादेखील होऊ लागतात.त्यामुळे एसीचा सुरक्षितपणे वापर कसा करावा हे जाणून घेणे आवश्यक आहे.एसीच्या देखभालीमध्ये काय सावधगिरी बाळगायला हवी, जेणेकरून अशा घटना टाळता येतील.तापमानातील वाढ हे एसीमध्ये स्फोट होण्यामागचं कारण आहे का?घरांमध्ये, कार्यालयांमध्ये एसीचा स्फोट होणे आणि वाढते तापमान यामध्ये संबंध आहे.

यामागे काय विज्ञान आहे, कूलिंगसाठी एसीच्या सभोवतालचं तापमान (कॉम्प्रेसरच्या आजूबाजूचं), कंडेन्सरच्या तापमानापेक्षा जवळपास १० अंश सेल्सिअसने कमी असले पाहिजे.भारतात सर्वसाधारणपणे एसीच्या कंडेन्सरचं तापमान ५० अंश सेल्सिअसपर्यंत असते. जेव्हा एसीच्या सभोवतालचे तापमान कंडेन्सरच्या तापमानापेक्षा अधिक होते, तेव्हा एसीचे काम करणे थांबते. अशा परिस्थितीत एसीच्या कंडेन्सरवरील दबाव वाढतो. त्यामुळे कंडेन्सरमध्ये स्फोट होण्याची शक्यता वाढते.अधिक तापमानाव्यतिरिक्त इतरही काही कारणांमुळे एसीच्या बाबतीतील अपघात किंवा घटना घडू शकतात.



**गॅस लीकेज :** जाणकार सांगतात की कंडेन्सरमधून गॅस गळती झाल्यामुळे देखील एसीशी संबंधित अपघात होऊ शकतो. गॅस कमी झाल्यामुळे कंडेन्सरवरील दबाव वाढतो. यामुळे तो अधिक गरम होऊ लागतो. त्यामुळे आग लागण्याची शक्यता वाढते.

**घाणेरडं कॉईल :** एसीच्या कूलिंगमध्ये कंडेन्सरचे कॉईल महत्त्वाची भूमिका बजावतात. ते हवेतून उष्णता बाहेर फेकते . कॉईलमध्ये घाण किंवा कचरा साठल्यामुळे ते जॅम होतात. त्यावेळेस गॅसच्या सामान्य प्रवाहात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे कंडेन्सर अधिक तापू लागतो. त्यातून आग लागण्याचा धोका वाढतो.

**व्होल्टेजमधील चढ–उतार :** व्होल्टेजमधील सततच्या चढ–उतारांमुळे देखील कॉम्प्रेसरच्या परफॉर्मन्सवर परिणाम होतो. यामुळे देखील अपघात होऊ शकतो.

**एसीमध्ये स्फोट होणे कसे टाळावे?**

उष्णता वाढल्यानंतर एसीच्या कॉम्प्रेसरला सावलीत ठेवावं. कॉम्प्रेसर आणि कंडेन्सर युनिटच्या जवळपास योग्य प्रकारे व्हेंटिलेशन असावं. म्हणजे तिथे हवा खेळती असावी. जेणेकरून ते युनिट अधिक तापत नाही.नियमितपणे एसीची सर्व्हिसिंग करावी. त्यामुळे कोणतीही समस्या वेळीच सोडवता येते.एअर फिल्टर आणि कूलिंग कॉईल्स नियमितपणे स्वच्छ करावेत. यामुळे कॉम्प्रेसरवर अधिक ताण येत नाही आणि तो योग्यप्रकारे काम करतो.वेळोवेळी कूलिंग फॅनदेखील तपासून घ्यावा. जर त्यात काही समस्या असेल तर ती लगेच दुरुस्त करावी.ज्या एसीचे कंडेन्सर तांब्याचे असतात, ते ॲल्युमिनियमचा कंडेन्सर असणाऱ्या एसीपेक्षा महागडे असतात. मात्र तांबे अधिक चांगले असते, असे जाणकार सांगतात.

तांबे या धातूची पाणी किंवा हवेतील आर्द्रतेबरोबर अभिक्रिया होत नाही. म्हणजे ते अधिक नॉन–कोरोसिव्ह (म्हणजे ते ओलावा किंवा आर्द्रतेमुळे खराब होत नाहीत) असते. त्यामुळे ते अधिक मजबूत असते.तांब्यामध्ये लो स्पेसफिक हीट प्रॉपर्टीचे वैशिष्ट्ये असते. त्यामुळे तांबे लवकर गरम होत नाही आणि कूलिंगदेखील लवकर करते.तज्ज्ञ अनेकदा, ॲल्युमिनियम धातू असणाऱ्या एसीऐवजी तांबे असणाऱ्या एसींना प्राधान्य देतात.ग्लोबल वॉर्मिंगचा भारतावरील परिणाम स्पष्ट दिसतो आहे. आता जवळपास दरवर्षी उष्णतेचा कहर अधिक वाढताना दिसतो आहे.


एका वृत्तानुसार, भारतातील ३० कोटी घरांपैकी फक्त ८ टक्के घरांमध्ये एअर कंडिशनर आहेत. यापैकी काही घरांमध्ये एकापेक्षा अधिक युनिट आहेत. असे असूनही, भारत ही एअर कंडिशनरची जगातील सर्वात वेगाने वाढणारी बाजारपेठ आहे.

इकोनॉमिक टाइम्समधील एका वृत्तानुसार, २०२५ मध्ये भारतात एअर कंडिशनर्सचे १ कोटी ४० लाख युनिट्स खरेदी करण्यात आले.गेल्या वर्षी जागतिक स्तरावर विकण्यात आलेल्या १७ कोटी एअर कंडिशनर युनिटपैकी ९ कोटी युनिटची विक्री चीनमध्ये झाली, तर भारतात १ कोटी युनिटची विक्री झाली.इंटरनॅशनल एनर्जी एजन्सी या पॅरिसमधील ऊर्जा थिंक टँकचा अंदाज आहे की २०५० पर्यंत भारतात घरगुती एअर कंडिशनरची मालकी ९ पटींनी वाढेल. टीव्ही, रेफ्रिजरेटर आणि वॉशिंग मशीनसह इतर सर्व घरगुती उपकरणांच्या मालकीतील वाढीपेक्षा ती कितीतरी अधिक असेल.

# सायंकाळी झोपू नये असे का म्हटले जाते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सायंकाळी झोपू नये, यामागे काही प्राचीन समजुती (मिथ्य) आहेत. तसेच काही ठोस शास्त्रीय (तथ्य) कारणे आहेत. यातील फरक समजावून घेणे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. बायोलॉजिकल क्लॉक सायंकाळी (सकाळ आणि रात्र यातील संधीकाळात) झोपल्याने शरीराचे नैसर्गिक जैविक घड्याळ विस्कळीत होते. ज्यामुळे रात्रीची गाढ झोप मिळण्यास त्रास होतो. **पचनक्रियेवर परिणाम :** आयुर्वेदानुसार सायंकाळी आपली 'अग्नी' (पचनशक्ती) मंदावलेली असते. यावेळी झोपल्यास शरीराचे



चयापचय आणखी मंदावते. **मानसिक आळस आणि सुस्ती :** सायंकाळी झोपून उठल्यानंतर अनेकदा डोके जड होणे, चिडचिड होणे किंवा सुस्ती येणे असे अनुभव येतात. **रात्रीच्या झोपेची गुणवत्ता :** जर तुम्ही सायंकाळी १–२ तास झोपलात, तर रात्री वेळेवर झोप येत नाही. यामुळे झोपेचे चक्र बिघडते आणि त्याचा परिणाम दुसऱ्या दिवशीच्या कामावर आणि आरोग्यावर होतो. **'लक्ष्मी घरी येत नाही' (आर्थिक नुकसान) :** जुन्या काळी ज्या व्यक्ती सायंकाळी कामाच्या वेळी झोपून राहायच्या त्यांना आळशी मानले जायचे. आळशी माणसाच्या घरी प्रगती होणे कठीण असते. त्यामुळे 'लक्ष्मी येत नाही' असे म्हटले गेले असावे. यामागे थेट अर्थशास्त्रीय कारण नसून 'आळस टाळा' हा संदेश देण्याचा प्रयन आहे. अनेकजण म्हणतात, की सायंकाळी झोपल्याने नकारात्मक शक्तींचा प्रभाव वाढतो. हे पूर्णपणे आध्यात्मिक किंवा लोककलेतील मिथ्य आहे. असे म्हटले जाते, की सायंकाळी झोपल्याने माणूस नेहमी आजारी पडतो. हे पूर्ण सत्य नाही. जर एखाद्या व्यक्तीला रात्रीची झोप पूर्ण मिळत असेल, तर चुकून एखादे दिवशी सायंकाळी डुलकी घेतल्याने कोणीही गंभीर आजारी पडत नाही. **तथ्य हे आहे की :** सायंकाळची वेळ ही आरोग्यासाठी सक्रिय राहण्याची आहे. यावेळी हलके व्यायाम, चालणे किंवा कौटुंबिक संवाद साधणे शरीराला आणि मनाला उभारी देते. **मिथ्य हे आहे की :** झोपल्यामुळे दैवी कोप होतो किंवा तत्काळ आर्थिक नुकसान होते. वास्तविक नुकसान हे तुमच्या आरोग्याचे आणि वेळेचे होत असते.

# कोकणातील सर्व आंबा उत्पादकांना एकटा माणूस पडतोय भारी!

**पान १ वरुन...** जेव्हा रिलायन्सला गुजरातमधील जामनगर येथील आपल्या रिफायनरीमध्ये गंभीर प्रदूषणाच्या समस्येला सामोरे जावे लागले. वाढत्या पर्यावरणीय चिंता आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या इशाऱ्यांना प्रतिसाद म्हणून, रिलायन्सने रिफायनरीच्या सभोवतालच्या पडीक जमिनीचे एका हिरव्यागार आंब्याच्या बागेत रूपांतर करण्याचा निर्णय घेतला. या उपक्रमाचा उद्देश प्रदूषण कमी करण्याबरोबरच औद्योगिक क्षेत्राभोवती एक शाश्वत हरित पट्टा निर्माण करणे हा होता. अंबानी याच्या या भव्य आमराईचे सम्राट अकबराशी कनेक्शन आहे. या बागेचे नाव १६ व्या शतकात मुघल सम्राट अकबराने बांधलेल्या ऐतिहासिक लखीबागपासून प्रेरित आहे. रिलायन्सने बागेला स्वच्छ पाणी पुरवण्यासाठी एक विलवणीकरण प्रकल्प उभारला आहे, ज्यामुळे परिसरातील प्रदूषणाची पातळी लक्षणीयरीत्या कमी झाली आहे.अंबानींच्या या बागेत जबरदस्त उत्पादन आणि बंपर कमाई होते. रिलायन्स या बागेतून दरवर्षी ६०० टनांहून अधिक आंब्यांची निर्यात करते. आंबा निर्यातीतून कंपनी कोट्यावधींची कमाई करते. या बागेतून अंबानी यांना वार्षाला ११,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल मिळतो. अंबानी यांच्या बागेतील सर्व प्रकारचे आंबे जगभर निर्यात होतात.

# कमकुवत हाडांवर जबरदस्त उपाय, खा फक्त दोन खारीक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खारीकमध्ये कॅल्शियम, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम मुबलक प्रमाणात असते. ज्यामुळे हाडे व दात मजबूत होतात. शरीराला त्वरित ऊर्जा मिळते. पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठता कमी होते. हिमोग्लोबिन वाढवून अशक्तपणा दूर करते. खारीक हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते. थंडीतील सर्दी–खोकल्यापासून संरक्षण करते. पुरुषांमध्ये स्टॅमिना आणि ताकद वाढवते. नियमित सेवनाने शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.



# जळगाव जिल्ह्यात ४३६ किलो गोमांस जप्त

## आठवड्यात २४ वेगवेगळ्या गुन्ह्यांत २५ जणांवर कारवाई ६१.३३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जळगाव जिल्हा पोलिसांनी २६ एप्रिल ते २ मे दरम्यान गोवंश वाहतूक आणि गोमांस बाबत मोठी कारवाई केली आहे. जळगाव जिल्ह्यातून १५.२३ लाखाचे ४३६ किलो अवैध गोमांस जप्त करण्यात आले आहे. गो तस्करीसाठी वापरलेली ४६.१० लाखाची २४ वाहने जप्त करून ७८ गायी ,बैल , म्हशी आणि गोऱ्ह्यांची सुटका करण्यात आली आहे. एकूण ६१.३३ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, चाळीसगाव अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर,जळगाव अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. मोहसीनखान पठाण (धरणगाव), अय्युब शेख (यावल), आजम शेख (शनीपेठ), सैय्यद रेहान रा. चाळीसगाव (भडगाव), अहमदखान कुरेशी (धरणगाव), मुस्तफा कुरेशी (धरणगाव/अडावद), जमिर शेख रा शेंदूरणी (पहूर), जावेद शेख, अमजद शेख (रावेर), विष्णू राठोड, अरबाज शेख, अजीज शेख (चाळीसगाव), महेंद्र राजपूत, विशाल सूर्यवंशी (मेहुणबारे), अकबर शेख (सावदा), साजिद शेख (एम आय डी सी ), भूषण पाटील (एरंडोल), याकूब पठाण, जाम्बाज मेहमूद (चोपडा), अनिस शेख रावेर, समीर शेख कसोदा, अकबर खान, शाकिर खान, अर्षद खान, अंबादास भुजाडे (चाळीसगाव), सलमान शेख (पाचोरा) अशा २५ जणाविरुद्ध गोवंश वाहतूक, अवैध गोमांस असे वेगवेगळे गुन्हे प्राणी संरक्षण अधिनियम व भारतीय न्याय संहिता कलम प्रमाणे वेगवेगळ्या पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आले आहेत.

# जिलेबीला इंग्रजीत काय म्हणतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग असलेल्या जिलेबीचा इतिहास आणि तिचे इंग्रजी नाव मोठे रंजक आहे. आपल्या दैनंदिन जीवनात आपण असे अनेक शब्द वापरतो, ज्यांचे इंग्रजी नाव आपल्याला ठाऊक नसते. असाच एक पदार्थ म्हणजे सर्वांची लाडकी जिलेबी. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनाच ही रसाळ जिलेबी आवडते. पण कधी विचार केला आहे का की याला इंग्रजीत नक्की काय म्हणतात? जिभेवर ठेवताच विरघळणारी आणि साखरेच्या पाकात डबडबलेली जिलेबी सर्वांनाच प्रिय आहे. पण या जिलेबीला इंग्रजीत काय म्हणतात, असा प्रश्न विचारला तर भल्याभल्यांची भंबेरी उडते. मात्र, पाश्चात्य देशात त्याचे वर्णन फनेल केक असे केले जाते. सिरप कोटेड डेझर्ट म्हणून ओळखली जाणारी ही जिलेबी



मुळात अरबी जलाबिया शब्दावरून भारतात आली आणि इथलीच होऊन गेली. खरे तर, जिलेबीला इंग्रजीत प्रामुख्याने जिलेबी असेच म्हटले जाते. कारण ही एक पारंपरिक भारतीय मिठाई असून त्यासाठी कोणताही एक विशिष्ट इंग्रजी शब्द शब्दकोशात नाही. मात्र, जर तुम्हाला कोणाला इंग्रजीत याची ओळख करून द्यायची असेल, तर तुम्ही साखरेच्या पाकात भिजवलेली, तेलात तळलेली सर्पिलाकार मिठाई किंवा साखरेच्या पाकात भिजलेला भारतीय फनेल केक असे म्हणू शकता.

# संस्कृती, कुटुंब आणि बदलती जीवनशैली...

## संस्कारांची गरज की आधुनिकतेचा अतिरेक?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या बदलत्या काळात कुटुंबव्यवस्थेचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला आहे. एकेकाळी कुटुंबात 'पुरुषी कारभार' होता, असे म्हटले जाते. मात्र, तो केवळ अधिकार गाजवण्यापुरता मर्यादित नव्हता; त्यामागे जबाबदारी, मर्यादा, आदर आणि संस्कृती जोपासण्याची एक भक्कम भावना होती. विशेष म्हणजे आपल्याकडे पूर्वीही 'स्त्री–सत्ताक' कुटुंब पद्धतीचे अस्तित्व होतेच. कुटुंबाच्या प्रत्येक निर्णयामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग असायचा. फरक इतकाच होता, की कमावता पुरुष अधिक गांभीर्याने आणि जबाबदारीने निर्णय घेत असे आणि निर्णय चुकला तर त्याची सर्व शिक्षाही तोच भोगत असे.

### १९९१ नंतरचे बदल आणि आयटी क्षेत्रातील भरारी

जागतिकीकरणानंतर संगणक आणि आयटी क्षेत्राचे दरवाजे उघडले आणि महिलांनी या क्षेत्रावर आपले वर्चस्व निर्माण केले. ही अभिमानाचीच बाब आहे. मात्र, मुलींना स्वावलंबी बनवण्याच्या प्रक्रियेत 'स्वैराचार' वाढला आहे का? हा प्रश्न आज प्रकर्षाने समोर येत आहे. अनेकदा मुलींच्या स्वातंत्र्याच्या नावाखाली त्यांना संस्कारांपासून दूर नेले जात असल्याचे वास्तव नाकारता येत नाही. आईच्या वाढलेल्या प्रभावामुळे अनेकदा 'बाप' नावाचा माणूस हतबल होताना दिसतो, तर काही ठिकाणी पुरुषही पत्नीच्या शब्दाबाहेर न राहिल्यामुळे कौटुंबिक समतोल ढासळत आहे.

स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार नव्हे हेच समजून घेतले जात नाही, ही चिंतेची बाब आहे. आजची पिढी, विशेषतः शहरी भागातील मुली, अधिक प्रगत झाल्या आहेत. मात्र, 'पैसे कमावते' या गर्वातून येणारा उद्धटपणा चिंतेचा विषय आहे. सकाळी उशिरापर्यंत झोपणे, बाहेरचे जेवण ऑर्डर करणे, विकेंडच्या नावाखाली रात्री उशिरापर्यंत घराबाहेर राहणे आणि वडिलांनी विचारले तर आईने मुलीची बाजू घेऊन वडिलांना गप्प करणे, यामुळे कुटुंबातील शिस्त मोडकळीस येत आहे. "आम्हाला आयुष्यभर घरात कोंडून ठेवले, पण मी माझ्या मुलीला मोकळे सोडणार," ही आईची भावना मुलीला स्वातंत्र्यापेक्षा स्वैराचाराकडे तर नेत नाही ना? याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

घरात पूर्ण कपड्यात वावरणे, वडीलधाऱ्यांचा आदर करणे, देवापुढे दिवा लावणे आणि घरात आलेल्या पाहुण्यांचा मान राखणे, हे आपले संस्कार आहेत. मात्र, आज घरात तोकडे कपडे घालून वावरण्यात धन्यता मानली जाते. आपल्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा मुलींच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा अट्टाहास मातांनी धरल्यामुळे संस्कृतीची पायमल्ली होत आहे. लग्नाच्या मिरवणुकीत रस्त्यावर नाचणे हा आनंदाचा भाग असला, तरी त्यात मर्यादांचे उल्लंघन होत असेल, तर तो चिंतेचा विषय ठरतो. यातूनच लग्नाचे निकष आणि अपेक्षांचा डोंगर कुटुंब पद्धतीला सुरुंग लावत आहे. आज मुलींच्या लग्नाचे निर्णय घेताना वडिलांना अनेकदा दुय्यम स्थान दिले जाते. फक्त 'पॅकेज' पाहून मुलगा पसंत केला जातो. लग्नानंतरही जुन्या मित्रांचा प्रभाव, सासरच्या मंडळींना दिलेली वागणूक आणि सहनशीलतेचा अभाव यामुळे घटस्फोटांचे प्रमाण वाढत चालले आहे. ग्रामीण भागातील चित्र तर अधिक विदारक आहे. आई–वडिलांनी आयुष्यभर काबाडकष्ट केले असले, तरी जावई मात्र पुण्याचा इंजिनिअर आणि १० लाखांच्या वर पॅकेज असलेलाच हवा, हा अट्टाहास का? स्वतःचे आयुष्य साध्या वरण–भातात गेले असताना जावयाकडे मात्र ३–बीएचके घर आणि आलिशान गाडीची अपेक्षा करणे कितपत योग्य आहे?

अशा अति अपेक्षा व स्वप्नपूर्तीचा दुराग्रह यामुळे संसाराचा समतोल बिघडला आहे. संसार म्हणजे केवळ पैसा किंवा पॅकेज नव्हे, तर ती एक तडजोड आणि व्यवस्था आहे. मुलाची दमछाक, त्याच्यावर असणारा ताण याचाही विचार कुटुंबातील स्त्रियांनी करायला हवा. संसाराची सुरूवात साध्या राहणीमानाने करण्यात काहीच कमीपणा नाही.



मिळून–मिसळून अर्धी भाकरी खाण्यात जे सुख आहे, ते हॉटेलमधील महागड्या जेवणात नाही. सुख म्हणजे काय याची व्याख्या बदलण्याची गरज निर्माण झाली आहे. स्त्री–पुरुष समानता ही स्वागतार्ह आहेच, परंतु समानतेचा अर्थ मूल्यांचे विस्मरण असा होऊ नये. आपली संस्कृती, कुलधर्म आणि कुलाचार जपणे ही काळाची गरज आहे. कुटुंबातील 'घरपण' टिकवायचे असेल, तर पैशाच्या मागे धावण्यापेक्षा नाती जपण्याला प्राधान्य द्यायला हवे. अन्यथा भविष्यात पुरुषांना स्वतःच्या अस्तित्वासाठी 'पुरुष मुक्ती चळवळ' सुरू करावी लागेल, अशी परिस्थिती निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# सिनेसंगीतातील संगीताचार्य..!

**स्मृतिदिन विशेष**



कोणताही संगीतकार गाणी बनवताना त्यात आपली कला, आपले सर्वस्व ओतत असतोच; पण तरी सगळी गाणी लोकप्रिय होतात, असे नाही. त्यांच्याकडे वैविध्य आहे, चालीत मुळातच गोडवा आहे अशी गाणी वर्षानुवर्षे आपल्याला त्यात गुंतवून ठेवतात, झपाटून टाकतात. एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व की ज्यांनी चित्रपट निर्माता, कवी, पटकथाकार, कंपोजर व संगीतकार म्हणून सन १९४० ते २००५ पर्यंत हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवले ते महानतम संगीतकार म्हणजे स्व. नौशाद अली. त्यांचा आज ५ मे रोजी स्मृतिदिन. त्यानिमित्त...

नौशादजींच्या संगीतात त्यांनी हिंदुस्तानी रागदारीचा अत्यंत खुबीने वापर करून रसिकांना रागदारीची ओळख करून दिली. तसेच ते सहज व सोपे करून रागदारीवर गाणी बांधली. उदा.- दरबारी रागातील 'ओ दुनियाके रखवाले' ( बैजू बावरा).

२६ डिसेंबर १९१९ ला लखनौ येथे जन्मलेल्या नौशादजींना लहानपणापासूनच संगीताची आवड होती. त्यांनी प्रख्यात उस्ताद गुरुबत अली, उस्ताद युसूफ अली व उस्ताद बब्बनखाँ साहेबांकडे शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. सिनेसंगीतातील त्यांचे गुरू उस्ताद झंडेखान व उस्ताद मुश्ताक हुसेन होते. काही काळ त्यांनी ६० रुपये मानधनावर संगीतकार खेमचंद प्रकाश यांच्याकडे त्यांचे सहाय्यक म्हणून काम केले. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत प्रसिद्ध गायक व अभिनेते स्व. के. एल. सैगल (जब दिलही टूट गया- शाहजहान) पासून तर आताच्या येसुदास यांच्याकडून लोकप्रिय तसेच शास्त्रीय संगीतावर आधारित असंख्य गाणी गाऊन घेतली. स्व. रफींनी त्यांच्याकडे जवळपास १४९ गाणी म्हटली. रफी आपल्या यशाचे श्रेय नौशादजींन्नाच देतात. रफी त्यांची आवडते गायक बनल्यानंतर नौशादजींनी संगीतात अनेक चमत्कार घडविले, हा इतिहास आहे.

त्यांचा प्रथम चित्रपट होता 'प्रेमनगर (१९४०)'. पण खरी प्रसिद्धी मिळाली 'रतन (१९४४)' या चित्रपटामुळे. यातील गाण्यांनी सिनेसंगीतात क्रांती घडविली. संपूर्ण चित्रपट तयार करायला निर्माता जेमिनी दिवाणला जेवढा खर्च आला त्याहून जास्त पैसे नौशादजींना रॉयल्टीद्वारे मिळाले होते. अभिनय आणि संगीत क्षेत्रातील नामवंत चार महाभागांनी (दिलीप कुमार, रफी, लता व नौशाद) त्या काळी अक्षरशः धुमाकूळ घातला होता. उदा.- कोहिनूर, लीडर, मुघले आझम, राम और शाम इत्यादी. पण 'बैजू बावरा' चित्रपटापासून खऱ्या अर्थाने 'नौशाद युग' सुरू झाले. शास्त्रीय संगीत सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे अवघड कार्य त्यांनी केले. त्याचबरोबर संगीत जाती-धर्माच्या पलीकडचे असते हे देखील त्यांनी दाखवून दिले. 'मन तळपत हरी दर्शन को आज' हे भक्तीगीत दररोज काशी-विश्वेश्वराच्या मंदिरात सकाळच्या प्रहरी ऐकवले जाते. या भक्तीगीताशिवाय काशी-विश्वेश्वराला जाग येत नाही, असे गमतीने म्हटले जाते. या गाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे गायक मोहम्मद रफी, गीतकार शकील बदायुनी व संगीतकार नौशादजी हे तिघेही धर्माने मुस्लीम होते. पण या गीताने जाती-धर्माच्या सर्व रेषा पुसून टाकल्या. १९५२ मध्ये प्रसारित झालेल्या या गीताची मोहिनी ७४ वर्षांनंतरही कायम आहे.

'मालकंस रागावर' आधारीत या गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या आदल्या दिवशी नौशादजींनी सर्व वादक, अँरेंजर व इतरांना सांगितले, की उद्या श्रीकृष्णाचे भजन रेकॉर्ड करायचे आहे, त्यासाठी शूचिर्भूत होऊन यायचे आहे. तसेच आपापल्या देवांची पूजा करून यायचे आहे. सुरूवातीला नौशादजींसह सगळ्यांनी प्रार्थना केली आणि मग रफी साहेबांनी हे अमर व अवीट गोडीचे भजन गायले. नौशादजींची संगीताप्रती असलेली भक्ती व श्रद्धा यातून अनुभवास येते. म्हणून त्यांच्या गाण्यांचे गारूड आजही आपल्यावर टिकून आहे.


स्व. नौशादजींनी त्यांच्या कारकिर्दीत एकूण ६५ चित्रपटांना संगीत दिले. पैकी २६ चित्रपट सिल्वर ज्युबिली तसेच ८ चित्रपट गोल्डन ज्युबिली व ४ चित्रपटांनी डायमंड ज्युबिली साजरी केली. 'मदर इंडिया (१९५७)' हा चित्रपट तर पहिला भारतीय सिनेमा होता जो ऑस्करसाठी नॉमिनेट झाला होता. ते अनेक राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानीत झाले. तसेच सन १९८१ मध्ये 'बैजू बावरा'साठी सर्वोत्तम संगीतकार म्हणून फिल्मफेअर अवॉर्डने सन्मानीत झाले. तसेच १९८१ मध्ये दादासाहेब फाळके पुरस्कार, १९९२ मध्ये पद्मभूषण पुरस्कार व संगीत नाटक अकादमी पुरस्काराने ते सन्मानीत झाले. भारतीय शास्त्रीय संगीताप्रती ऋण व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने त्यांच्या विनंतीला मान देऊन 'नौशाद अकॅडमी ऑफ हिंदुस्तानी संगीत'साठी भूखंड दिला. अशा या महान संगीताचार्याचा मृत्यू ५ मे २००६ रोजी मुंबई येथे झाला. त्यांच्या स्मृतींना व संगीतरचनांना नमन करताना एवढेच म्हणूया...

'छुप गये वो सारे हस्ती छेडकर, अब तो बस आवाजही आवाज है..!'

**– शरद आ. सोनवणे, अमळनेर.**
**मो. : ९४२०१ ०८३०५**

# एक शानदार कॉमेडियन : राजिंदरनाथ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



खून के आंसू रोने को मजबूर हो गया था ये कलाकार। इस ज़ालिम दुनिया ने इस कलाकार के सीधेपन का इतना फ़ायदा उठाया कि ये सड़क पर आने ही वाले थे। बस किस्मत ही थोड़ी सही रह गई कि हालात उतने बुरे भी नहीं हुए। आप सभी इन्हें जानते-पहचानते हैं। राजिंदरनाथ। पुरानी फ़िल्मों के एक शानदार कॉमेडियन।

वो कॉमेडियन जो महमूद की लहर में भी ना सिर्फ़ इंडस्ट्री में टिके रहे, बल्कि स्टार कॉमेडियन का रुतबा हासिल कर गए। आज राजिंदरनाथ जी की पुण्यतिथि है। साल २००८ की तेरह फ़रवरी को राजिंदरनाथ जी का देहांत हुआ था। ये भले ही राज कपूर के रिश्तेदार रहे हों। प्रेमनाथ के छोटे भाई रहे हों। लेकिन फ़िल्म इंडस्ट्री ने वाकई में इन्हें खून के आंसू रुला दिया था। क्या हुआ था इनके साथ? चलिए जानते हैं। वास्तव में साल १९६९ से राजिंदरनाथ जी का बुरा वक्त शुरू हुआ था। उस साल राजिंदरनाथ एक बड़ी कार दुर्घटना का शिकार हो गए थे। उन्हें कई महीने अस्पताल में रहना पड़ा था। नतीजा ये हुआ कि उनके पास काम नहीं रहा। उनकी आर्थिक स्थिति बुरी तरह चरमरा गई। करियर पर भी बहुत बुरा असर पड़ा। राजिंदरनाथ जी जब ठीक हुए तो उन्होंने फ़िल्म निर्माण के क्षेत्र में कदम रखने का फ़ैसला किया। लेकिन वो फ़ैसला उनके लिए बहुत गलत और बुरा साबित हुआ। १९७४ में राजिंदरनाथ जी ने एक फ़िल्म का निर्माण शुरू किया जिसका नाम था "द गेट क्रैशर।" फ़िल्म में इनके भांजे रणधीर कपूर हीरो थे। और नीतू सिंह हीरोइन थी। एक इंटरव्यू में राजिंदरनाथ जी ने बताया था कि भले ही वो पिछले कई सालों से फ़िल्म इंडस्ट्री से जुड़े थे। लेकिन वहां काम के तौर-तरीकों से एकदम अनजान थे। ना ही फ़िल्म निर्माण का उन्हें कोई अनुभव था। इसलिए जिसने जितने पैसे मांगे, वो देते चले गए।

लोगों पर भरोसा करके उन्होंने हाथ खोलकर खर्च किया अपनी फ़िल्म पर। इसका नतीजा ये हुआ कि मात्र १० दिनों की शूटिंग के बाद उस फ़िल्म की शूटिंग रुक गई। और राजिंदरनाथ भारी कर्ज़े के बोझ तले आ गए। दिल्ली और यूपी के डिस्ट्रीब्यूटर्स से उन्होंने जो रुपया फ़िल्म के लिए उधार लिया था उसे चुकाना उनके लिए भारी पड़ गया। राजिंदरनाथ जी के मुताबिक, "उन लोगों को मेरी हालत के बारे में सब पता था। लेकिन उन्होंने एक-एक पैसा मय ब्याज, भारी ब्याज के वसूला। उन्हीं लोगों की वजह से मुझे खून के आंसू रोना पड़ा था।" वो कर्ज़ उतारने के लिए राजिंदर कुमार जी ने फ़िल्मों में हर तरह के किरदार निभाने शुरू कर दिए। अच्छे-बुरे, जैसे भी किरदार मिले, वो निभाते चले गए। और बहुत संघर्ष के बाद वो कर्ज़ के चुंगल से आज़ाद हुए। पुराने ज़माने के एक और कॉमेडियन व सपोर्टिंग एक्टर थे जिनका नाम बीरबल था। वो राजिंदरनाथ जी के बहुत अच्छे दोस्त थे। बीरबल जी ने एक इंटरव्यू में राजिंदरनाथ जी के बारे में बात करते हुए कहा था कि राजिंदरनाथ बहुत ईमानदार और शरीफ़ थे। बहुत सीधे थे। मगर हर किसी ने उनके सीधेपन का फ़ायदा उठाया। लेकिन राजिंदरनाथ ने कभी किसी का दिल नहीं दुखाया। अनेकों मुश्किलें उन्होंने झेली। जाने कितनी तकलीफ़ों से रूबरू हुए। मगर किसी का पैसा उन्होंने नहीं मारा। एक-एक पाई उन्होंने चुकाई थी। लेकिन उनके बारे में किसी ने नहीं सोचा। जीवन के आखिरी दिनों में वो बहुत उदास रहते थे। उन्हें जानने वाले कहते थे कि लगता ही नहीं कि ये वही राजिंदरनाथ हैं जो कभी फ़िल्मों में इतनी बढ़िया कॉमेडी करते थे। अपने दोनों भाईयों, प्रेमनाथ और नरेंद्रनाथ की मौत से भी राजिंदरनाथ जी को सदमा पहुंचा था। भाईयों कीमौत का उनके मानसिक स्वास्थ्य पर गहरा और बुरा असर पड़ा था। राजिंदरनाथ जी के दो बच्चे, एक बेटा व एक बेटी हैं। उनका बेटा तो किसी विदेशी एयरलाइन कंपनी में नौकरी करता है। लेकिन बेटी के बारे में कोई जानकारी फ़िलहाल नहीं मिल सकी हमें। राजिंदरनाथ जी को किस्सा टीवी बहुत सम्मान से याद करता है। और धन्यवाद कहता है उन्हे। क्योंकि उनकी फ़िल्मों ने भी हमारा और आपका बहुत मनोरंजन किया है। राजिंदरनाथ जी को नमन। शत शत नमन।

# आमसुलाची चटणी श्राद्धाच्या जेवणात का महत्त्वाची आहे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आमसुलाची चटणी (कोकम चटणी) श्राद्धाच्या जेवणात महत्त्वाची मानली जाते. कारण ती हिंदू संस्कृतीतील परंपरा, धार्मिक श्रद्धा आणि पवित्र अन्न असून पाककृतीच्या दृष्टीने विशेष स्थान राखते.श्राद्धाच्या जेवणात सात्त्विक आणि साध्या पदार्थांचा समावेश केला जातो. कारण हे जेवण पूर्वजांना अर्पण केले जाते. आमसूल हे नैसर्गिक, शुद्ध आणि सात्त्विक मानले जाते. त्याची आंबट चव जेवणाला संतुलित करते आणि पचनास मदत करते, जे श्राद्धाच्या जेवणाच्या साधेपणाशी सुसंगत आहे. आमसूलमध्ये पचन सुधारणारे आणि शरीराला थंडावा देणारे गुणधर्म आहे. श्राद्धाच्या जेवणात अनेकदा तूप, डाळी, भात आणि साधे पदार्थ असतात, जे पचनासाठी काहीसे जड असू शकतात. आमसुलाची चटणी पचन सुलभ करते आणि जेवणाला हलकेपणा आणते. विशेषतः महाराष्ट्र, कोकण, गोवा आणि कर्नाटकात कोकमचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. श्राद्धाच्या जेवणात स्थानिक आणि हंगामी पदार्थांचा समावेश करणे ही परंपरा आहे, कारण असे मानले जाते की पितरांना त्या काळात उपलब्ध असलेले पदार्थ प्रिय असतात. आमसूल स्थानिक पदार्थांमध्ये महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्याची चटणी श्राद्धात समाविष्ट केली जाते.



# उन्हाळ्यात केसगळतीची समस्या का उद्भवते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उन्हाळ्यात उन्हामुळे, धुळीमुळे, घामामुळे आणि प्रदूषणामुळे केसगळतीची समस्या खूप जास्त होते. केवळ महिलाच नाही तर पुरुषांना सुद्धा ही समस्या होते. अशात जर केसांची योग्य काळजी घेतली गेली नाही तर केस कमजोर होऊन केस गळू लागतात. अनेकदा वेगवेगळ्या प्रॉडक्टमध्ये असलेल्या हानिकारक केमिकल्समुळे केस डॅमेज होतात. अशात काही टिप्स फॉलो करून पुरुष त्यांच्या केसांची काळजी घेऊ शकतात.



**१) ड्राय केसांसाठी काय करावे?**

केस ड्राय असण्याचं कारण डोक्याची त्वचा कोरडी किंवा रखरखीत असणे. यामुळे केसांमध्ये डॅंड्रफ होतात. अशात केसांची तेलाने मालिश करणे गरजेचं आहे. गरम पाण्याने केस धुतल्याने केसांचा रखरखीतपणा आणखी वाढतो. यामुळे गरम पाण्याने केस न धुणे हेच केसांसाठी फायदेशीर ठरतं.

**२) तेलकट केसांसाठी काय करावे?**

जर केस कमी चिकट आणि तेलकट दिसावे असे वाटत असेल तर, यासाठी ऑइल फ्री शॅम्पूचा वापर करावा. सोबतच केस धुतल्यानंतर कंडीशनर लावा. डोक्याच्या ऑयली त्वचेवर तेल लावू नका. याने केस आणखी जास्त तेलकट दिसू शकतात.

**३) केस धुतांना काय काळजी घ्यावी?**

केस धुण्यासाठी कोमट पाण्याचा वापर करावा आणि आठवड्यातून कमीत कमी २ ते ४ वेळा तेलाने मालिश करा. केस धुतल्या नंतर कंडीशनर जरूर लावा. चांगलं वाटत असलं तरी केस धुण्यासाठी फार गरम पाण्याचा वापर करू नये. याने केस अधिक कमजोर होतात. सोबतच केस कोरडे करण्यासाठी ड्रायरचा वापर करू नका. याने केसांवर दबाव पडतो आणि केस तुटतात.

# दो बहनें चार बार फेल हुईं, लेकिन फिर भी उन्होंने हार नहीं मानी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यूपीएससी जैसा मुश्किल एग्जाम पास करना आसान नहीं है, लेकिन कड़ी मेहनत और सही स्ट्रेटेजी से सफलता पक्की है। यहां सौम्या मिश्रा और सुमेघा मिश्रा की ऐसी ही इंस्पायरिंग स्टोरीज़ हैं, जिन्होंने यूपीएससी एग्जाम को सक्सेसफुली क्लियर करके अपने परिवार और देश का नाम रोशन किया है।

**एक बहन आयएएस बनी, दूसरी आयआरएस**


सौम्या मिश्रा ने यूपीएससी एग्जाम में बहुत अच्छा किया और आयएएस (इंडियन एडमिनिस्ट्रेटिव सर्विस) में जगह बनाई, जबकि उनकी बहन सुमेघा मिश्रा ने आयआरएस (इंडियन रेवेन्यू सर्विस) में जगह बनाई। उनकी सफलता हज़ारों युवाओं के लिए इंस्पिरेशन बन गई है।

**पढ़ाई और तैयारी**

**सक्सेस स्टोरी**

दोनों बहनों ने अपनी पढ़ाई पर बहुत ध्यान दिया और एक अच्छे प्लान के हिसाब से तैयारी की। उनकी तैयारी में एनसीइआरटी की टेक्स्टबुक पढ़ना, करंट अफेयर्स पर फोकस करना और आंसर-राइटिंग की प्रैक्टिस करना शामिल था।

दोनों ने एक ही साल में सफलता हासिल की। सौम्या मिश्रा २०२४ में आयएएस बनीं। उन्होंने यूपीएससी सीएसइ २०२४ में ऑल इंडिया रैंक १८ हासिल की। वहीं, सुमेघा ने इस साल ऑल इंडिया रैंक २५३ हासिल की। दोनों बहनों ने एक साथ तैयारी की और एक साथ सफलता हासिल की।



सौम्या मिश्रा ने यूपीएससी एग्जाम में बहुत अच्छा किया औरआयएएस (इंडियन एडमिनिस्ट्रेटिव सर्विस) पोस्ट हासिल की, जबकि उनकी बहन सुमेघा मिश्रा ने आयआरएस (इंडियन रेवेन्यू सर्विस) में जगह बनाई। इन बहनों की सफलता हजारों युवाओं के लिए प्रेरणा बन गई है।

**परिवार का सपोर्ट**

दोनों बहनों की सफलता में उनके परिवारों का अहम रोल रहा। उन्होंने हर मुश्किल समय में उनका हौसला बढ़ाया और उन्हें आगे बढ़ने के लिए प्रेरित किया। चार बार फेल होने के बाद भी उन्होंने हार नहीं मानी। उनकी सफलता का राज है फेल होने पर भी सब्र न खोना।

**दो बहनों की कहानी, लाखों लोगों के लिए प्रेरणा**

सौम्या मिश्रा और सुमेघा मिश्रा की सफलता की कहानियां बताती हैं कि यूपीएससी जैसे एग्जाम में सफलता के लिए लगातार कड़ी मेहनत, सही स्ट्रेटेजी और कॉन्फिडेंस की जरूरत होती है। अगर लक्ष्य साफ हो और कोशिशें सही दिशा में की जा रही हों, तो सफलता पक्की है।

# पंतप्रधान नरेंद्र मोदी नक्की कोणता फोन वापरतात?

## आपणास तो खरेदी करता येतो का?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची काम करण्याची पद्धत, त्यांचा साधेपणा आणि डिजिटल इंडियासाठी घेतलेला पुढाकार नेहमीच चर्चेत असतो. जगातील सर्वात प्रभावशाली नेत्यांपैकी एक म्हणून त्यांना ओळखले जाते. पण पंतप्रधानांच्या सुरक्षेचा विषय येतो, तेव्हा त्यांच्या संवादाची गोपनीयता हा राष्ट्रीय सुरक्षेचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग बनतो.

अशा परिस्थितीत पंतप्रधान मोदी कोणता फोन वापरतात आणि तो किती सुरक्षित असतो, याबाबत सर्व सामान्यांमध्ये कायमच उत्सुकता पाहायला मिळते. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अधिकृत संवादासाठी रॅक्स या विशेष फोनचा वापर केला जातो. हा फोन कोणत्याही खाजगी कंपनीने बनवलेला नसून, भारत सरकारच्या सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ टेलिमॅटिक्स' या संस्थेने विकसित केला आहे. या फोनमध्ये लष्करी दर्जाच्या सुविधा असतात. ज्यामुळे दोन व्यक्तींमधील संभाषण तिसरी व्यक्ती किंवा कोणतीही टेलिकॉम कंपनी ऐकू शकत नाही.

हा फोन सामान्य इंटरनेट नेटवर्कशी जोडलेला नसतो. तो एका खास फ्रिक्वेन्सी बँडवर आणि अनेकदा सॅटेलाइट लिंकद्वारे काम करतो, ज्यामुळे तो हॅक करणे अशक्य मानले जाते. हा फोन बाजारात खरेदीसाठी उपलब्ध नसून, तो केवळ व्हीव्हीआयपी आणि अतिसंवेदनशील पदांवरील व्यक्तींसाठीच डिझाईन केलेला आहे. सोशल मीडिया अपडेट्स किंवा सेल्फी घेताना पंतप्रधानांच्या हातात अनेकदा आयफोन दिसून येतो. अँड्रॉइडच्या तुलनेत आयफोनची क्लोज्ड इकोसिस्टम अधिक सुरक्षित मानली जाते, हे त्यामागचे मुख्य तांत्रिक कारण आहे.

मात्र, मोदी वापरत असलेला आयफोन हा सर्वसामान्य आयफोनसारखा नसतो. त्यामध्ये सरकारी यंत्रणांनी विशेष सिक्युरिटी पॅचेस इन्स्टॉल केलेले असतात. या फोनमधील सॉफ्टवेअर अत्यंत कडक देखरेखीखाली असते. त्यात सामान्य ॲप्सऐवजी केवळ सुरक्षित आणि मर्यादित सुविधा असतात. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या डिजीटल सुरक्षेची जबाबदारी एसपीजी आणि एनटीआरओ या संस्थांकडे असते. पंतप्रधान कधीही कोणत्याही असुरक्षित वाय-फाय नेटवर्कला फोन कनेक्ट करत नाहीत.

तसेच त्यांच्या प्रत्येक कॉलची तांत्रिक तपासणी केली जाते आणि फोनमधील डेटा दररोज मॉनिटर केला जातो. पंतप्रधान मोदी हे तंत्रज्ञानप्रेमी असले तरी ते तासनतास फोनवर व्यस्त राहणे टाळतात. त्यांचे बहुतांश अधिकृत कॉल्स त्यांच्या कर्मचारी वर्गामार्फत किंवा प्रधान सचिवांमार्फत हाताळले जातात. ते गॅजेट्सचा वापर केवळ गरजेपुरता करून प्रत्यक्ष कामाला आणि फाईल्सना अधिक वेळ देतात.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






# ज्येष्ठात ८ वेळा येणार 'मोठा मंगळ'

## हनुमानजींच्या भक्तांसाठी सुवर्णसंधी; या दिवशी करा विशेष पूजा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सहसा ज्येष्ठ महिन्यात ४ ते ५ वेळा मोठा मंगळ येतो. पण यंदा अधिक महिन्यामुळे ८ वेळा मोठा मंगळ येणार आहेत. ज्येष्ठ महिना २ मे २०२६ पासून सुरू होईल आणि २९ जून २०२६ पर्यंत चालेल. दरम्यान, १७ मे २०२६ रोजी अधिक महिना देखील सुरू होईल.

बडा मंगळ (किंवा मोठा मंगळ) हा प्रामुख्याने उत्तर भारतात, विशेषतः लखनौ, उत्तर प्रदेशात ज्येष्ठ महिन्यातील मंगळवारी साजरा केला जाणारा हनुमानजींच्या भक्तीचा सण आहे. मान्यतांनुसार या दिवशी हनुमानजी प्रभू श्रीरामचंद्रांना पहिल्यांदा भेटले होते. या दिवशी हनुमानजींच्या मंदिरांमध्ये भंडारे (अन्नदान) आणि विशेष पूजा केली जाते, ज्याला 'बुधवा मंगल' असेही म्हणतात

ज्येष्ठ महिना सुरू होणार आहे. ज्येष्ठ महिन्यातील मंगळवारला बडा मंगळ किंवा मोठा मंगळ म्हणतात. हा दिवस केसरीनंदन हनुमानजींना खूप प्रिय आहे. भगवान हनुमानजींचे भक्त सर्व नियम आणि अटींचे पालन करून त्यांची पूजा करतात. असे म्हटले जाते, की 'या दिवशी बजरंगबलींची योग्य पूजा केल्याने जीवनातील सर्व दुःखे आणि त्रास दूर होतात. माणसाची प्रत्येक इच्छा पूर्ण होते, ज्यासाठी तो हनुमानजींची पूजा करतो. यावर्षी ज्येष्ठ मंगळ बडा मंगळा दुर्मिळ योग साधत आहे.'

हिंदू पंचांगानुसार, यंदा ज्येष्ठ महिन्यात ८ वेळा मोठा मंगळ येत आहेत.



**मोठा मंगळ कधी येईल?**
**पहिला मोठा मंगळ : ५ मे २०२६ रोजी**
**दुसरा मोठा मंगळ : १२ मे २०२६ रोजी**
**तिसरा मोठा मंगळ : १९ मे २०२६ रोजी**
**चौथा मोठा मंगळ : २६ मे २०२६ रोजी**
**पाचवा मोठा मंगळ : २ जून २०२६ रोजी**
**सहावा मोठा मंगळ : ९ जून २०२६ रोजी**
**सातवा मोठा मंगळ : १६ जून २०२६ रोजी**
**आठवा मोठा मंगळ : २३ जून २०२६ रोजी**

सहसा ज्येष्ठ महिन्यात ४ किंवा ५ वेळा मोठे मंगळ असतात. यावेळी ८ वेळा मोठा मंगळ येणार आहे. कारण यंदा अधिक महिना देखील आहे. वास्तविक पाहता ज्येष्ठ महिना २ मे पासून सुरू होऊन २९ जूनपर्यंत चालेल. दरम्यान, १७ मे रोजी एक महिन्यापेक्षा जास्त काळ आहे. हा अधिक महिना ज्येष्ठ महिन्यात येत आहे. त्यामुळे याला ज्येष्ठ महिना म्हटले जाईल. हा अधिक महिना १५ जून रोजी संपेल. यानंतर ज्येष्ठ महिना २९ जून रोजी संपेल. या संपूर्ण काळात एकूण ८ मोठे मंगळ असतील.

### एप्रिल महिन्यातील फक्त १० दिवस बाकी; कोणाला मिळेल बक्कळ फायदा?

मोठ्या मंगळाच्या पूजेची पद्धत : मोठ्या मंगळाच्या दिवशी सकाळी लवकर उठा, स्नान करा आणि स्वच्छ कपडे घाला. या दिवशी तुम्ही भगव्या किंवा लाल रंगाचे कपडे घाला. यानंतर, हनुमानाचे स्मरण करा आणि उपवास करा. यानंतर, हनुमानजींसमोर मोगऱ्याच्या तेलाचा दिवा लावा. बजरंगबलीला रोट हा प्रसाद खूप प्रिय आहे. तुम्ही त्याचा आनंद घेऊ शकता. याव्यतिरिक्त, लाडू, गूळ किंवा नारळही अर्पण करता येतात. तुमची इच्छा असल्यास या दिवशी तुम्ही हनुमानजींना चोळादेखील अर्पण करू शकता. यासाठी, शेंदूर मोगऱ्याच्या तेलात मिसळून बजरंगबलीच्या प्रतिमेवर लावावा. यानंतर हनुमान चालीसा, बजरंग बाण किंवा हनुमान अष्टक यांचे पठण करावे.

# दररोज किती अगरबत्ती लावाव्यात?

## धार्मिक आणि वैज्ञानिक कारणे जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दररोज सकाळ आणि सायंकाळ पूजा ही हिंदू धर्मात शतकानुशतके जुनी परंपरा आहे. शास्त्रांनुसार आपल्या आवडत्या देवतांचे स्मरण करून नियमित पूजा केल्याने कुटुंबात आनंद आणि समृद्धी मिळते. असे मानले जाते, की पूजा केल्याने केवळ व्यक्तीला आंतरिक आनंद मिळत नाही तर त्याच्या कामातील अडथळे देखील दूर होतात. म्हणून पूजा नेहमीच योग्य विधींनी करावी. पूजेदरम्यान दिवा लावणे हा एक विधी असला, तरी अगरबत्ती लावण्याचे देखील विशेष महत्त्व आहे. तसेच हिंदू धर्मात पूजेदरम्यान अगरबत्ती लावणे शुभ मानले जाते. शास्त्रांनुसार दोन किंवा चार अगरबत्ती लावल्याने देव-देवतांचा आशीर्वाद मिळतो आणि घरात सकारात्मक ऊर्जा पसरते. तसेच त्याचे वैज्ञानिक महत्त्व देखील आहे. अगरबत्ती लावणे हे सुख आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. असे मानले जाते, की पूजादरम्यान त्या अगरबत्ती लावल्याने घरात लक्ष्मीचा आशीर्वाद राहतो आणि भक्ताला आध्यात्मिक लाभ देखील मिळतो. पण तुम्हाला माहिती आहे का पूजादरम्यान किती अगरबत्ती लावाव्यात?

### किती अगरबत्ती लावल्या पाहिजेत?

ज्योतिषांच्या मते पूजेदरम्यान नेहमीच अगरबत्ती लावल्या पाहिजेत. यामुळे पूजेचे पूर्ण फायदे मिळतात. या काळात नेहमीच दोन अगरबत्ती लावल्या पाहिजेत. असे मानले जाते की पूजेदरम्यान दोन अगरबत्ती लावल्याने कुटुंबाला सर्व देव-देवतांचे आशीर्वाद मिळतात. धार्मिक विधी दरम्यान सामान्यतः चार अगरबत्ती लावाव्यात. हे अत्यंत शुभ मानले जाते. असे मानले जाते की चार अगरबत्ती लावल्याने सर्व समस्या दूर होतात.

### अगरबत्ती लावण्याचे महत्व

घरात दररोज अगरबत्ती लावल्याने कुटुंबात सकारात्मकता टिकून राहते. असे मानले जाते की अगरबत्तीचा सुगंध घरात पसरतो, ज्यामुळे मनाला शांती आणि आनंद मिळतो. त्यामुळे तणावही कमी होतो आणि एकाग्रता सुधारते.

### अगरबत्ती लावण्याची वैज्ञानिक कारणे

शास्त्रज्ञांच्या मते अगरबत्ती लावल्याने सूक्ष्मजीवांचा नाश होतो. असा विश्वास आहे की पूजेसाठी तयार केलेल्या अगरबत्तीमध्ये अनेक संयुगे असतात जे कीटकांना दूर करण्यास मदत करतात.

# खंडोबांना भगवान शिवांचे अवतार का मानले जाते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खंडोबा किंवा खंडेराय हे मुख्यत्वे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांतील लोकप्रिय हिंदू दैवत आहे. हे दैवत महाराष्ट्रातील अनेकांचे कुलदैवत आहे. प्रामुख्याने गोसावी, मल्हारकोळी, मातंग, मराठा, सोनकोळी, वैती, आगरी, गवळी, माळी, कुणबी, भंडारी, वाडवळ, खारवी, भोई, कराडी, रामोशी (नाईक), धनगर समाजाचे, तसेच कित्येक ब्राम्हण व प्रभु समाजातील लोकांचे कुलदैवत मानले जाते.

परंपरेने खंडोबा हा शंकराचा अवतार मानला जातो. खंडोबाच्या परिवारात म्हाळसा, बाणाई या पत्नी; हेगडे हा प्रधान (हा बाणाईचा भाऊ आहे) आणि कुत्रा आणि वाहन घोडा यांचा समावेश होतो. खंडोबाच्या मूर्ती बैठ्या, उभ्या व अश्वारूढ अशा स्वरूपात असून हातात डमरू, त्रिशूळ, खंडा (अतिशय मोठी आणि जड तलवार) आणि पानपत्र असून तो चतुर्भुज व कपाळाला भंडारा लावलेल्या रूपात असतो.

एका मतानुसार खंडोबा हे नाव या देवतेच्या खंडा (संस्कृत ख - मराठी खंडा) या शस्त्रावरून आले आहे. दुसऱ्या मतानुसार हा संस्कृत स्कंद शब्दाचा अपभ्रंश आहे. (स्कंद-स्कंदोबा - खंडोबा) याखेरीज मल्हारी (मल्लारी), खंडेराय, मार्तंड-भैरव, म्हाळसाकांत, रवळनाथ, येळकोटी (येळ=सात, सात कोटी सैन्य असलेला) ही खंडोबाची इतर नावे होत. मल्लू खान आणि अजमत खान (अजमत = चमत्कार) ही नावे खंडोबाच्या मुसलमान भक्तांमध्ये लोकप्रिय आहेत. ते खंडोबाच्या खंडा शस्त्रास मल्लू खान की गदा अशा नावाने संबोधतात. मल्ह/मल्ल + अरी अशी मल्हारी शब्दाची फोड असून मल्ल राक्षसाचा शत्रू असा त्याचा अर्थ आहे. म्हाळसेचा पती म्हणून खंडोबास म्हाळसाकांत असे म्हणतात. येळकोटी म्हणजे सात कोटी सैनिकांचा नायक. खंडेराय (राय = राजा) हे नावही खंडोबाचे राजेपण दर्शविते.





कर्नाटकात खंडोबास मैलार किंवा खंडू गौडा (स्वैरपणेः खंडू पाटील) तर आंध्रात मल्लाण्णा नावाने ओळखतात. मल्हार हा महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांचा लोकप्रिय असा कुलस्वामी (कुलदैवत) आहे. खंडोबाचेही ते एक नाव आहे. खंडोबा हा शंकराचा अवतार समजला जातो. मल्लासुर दैत्याचा संहार केला, मल्लाची हार झाली म्हणून मल्ल + हार अशा रितीने मल्हार हे नाव मिळाले असावे. 'येळकोट येळकोट जय मल्हार' असा या देवाचा जयघोष केला जातो. मल्हारी मार्तंड (मल्लारिमार्तंड) असेही नामाभिधान आहे. मूळ संस्कृतमध्ये या नावाचा उच्चार "मल्लार" असा आहे. खंडोबा म्हाळसा मणिमल्लांचा संहार करताना (मूळ शिळाचित्राचे वर्ष - १८८०) खंडोबा हे दैवत अकराव्या शतकापासून लोकप्रिय झाले असावे.

१) खंडोबाचे ऐतिहासिक उल्लेख चौदाव्या शतकापासून येतात.

२) खंडोबावरील सर्वाधिक महत्त्वाचा ग्रंथ मल्हारी माहात्म्य सांगतो की मल्हारीचा निर्देश ब्रह्मांड पुराणातील क्षेत्रकांडात केला आहे. पण या पुराणाच्या प्रमाण आवृत्तीत याचा उल्लेख मिळत नाही.

३) मूळचे लोकदैवत असलेल्या खंडोबाचे क्रमशः वैदिकीकरण झाल्याचे दिसते. लोककथा या देवतेस पौराणिक शिव व वैदिक रुद्र यांचा पूर्णावतार मानतात. खंडोबाच्या परिवारातील इतर सदस्यांचेंही वैदिकीकरण झाले आहे. यामुळे म्हाळसा बाणाई या पार्वती व गंगा यांच्या, रक्त पिणारा खंडोबाचा कुत्रा कृष्णाचा तर शुभ्र घोडा नंदीचा अवतार मानला गेला.

४) खंडोबा हे दैवत वैदिक पशुपती रुद्राप्रमाणे दरोडेखोर, घोडा आणि कुत्रा यांच्याशी संबंधित आहे. खंडोबाचा भक्तिपंथ किमान बाराव्या शतकापासून अस्तित्वात आहे. महानुभाव पंथीय चक्रधर स्वामींनी खंडोबाचा उल्लेख केला आहे. आंध्राच्या काकटीय सम्राटांचे खंडोबा हे कुलदैवत होते. मल्हारी माहात्म्य ग्रंथातील प्रेमपुरी जागा कर्नाटकातील बिदरजवळचे आदी मैलार स्थान आहे असे मानले जाते. आदी मैलार खंडोबाच्या बारा प्रमुख स्थानांमध्ये मोडते. मराठी परंपरेने मूळचा प्रेमपुरीचा खंडोबा प्रेमपुरी -नळदुर्ग -पाली (जि. सातारा) असे करत जेजुरीस स्थिरावला.

५) मराठी परंपरेत खंडोबा कानडी देव मानला जात असल्याचे संशोधक सोन्थेमर सांगतात. दखखनच्या लिंगायत, जैन व इतर व्यापाऱ्यांनी खंडोबा पंथाचा प्रसार केला असावा. पैठणच्या मराठी कंडक यक्षाशीही या देवतेचे एकीकरण झाले आहे. महात्मा फुले यांनी खंडोबा देवतेस बळीराजाच्या राज्यातील महाराष्ट्र क्षेत्राचा अधिपती मानले आहे. महाराष्ट्र क्षेत्र विस्ताराने मोठे असल्याने बळीराजाने या प्रदेशाचे नऊ खंड केले. जेजुरीचा क्षेत्रपती असणारा खंडोबा त्यातील एक होय. खंडोबाचे मार्तंड हे नाव "मार-तोंड" यावरून आले असल्याचे त्यांचे मत आहे.

१) जेजुरीचे मंदिर वीरपाल वीरमल्ल याने इ.स. १३८१ मध्ये बांधले. १६३५ मध्ये खटावच्या राघो मंबाजीने याचा विस्तार केला.

२)बंगाली संत चैतन्य महाप्रभू यांनी या मंदिरास भेट दिली होती व मुरळींचा वेश्याव्यवसाय बंद करण्याचे प्रय्त्न केले होते; असे ऐतिहासिक उल्लेख आहेत. जेजुरी गडावरील शिलालेखांत विठ्ठल सदाशिव विंचूरकर, मल्हारराव होळकर वगैरेंचे उल्लेख येतात. नारायणरावाच्या हत्येनंतर नाना फडणीस यांनी नारायणरावाची गरोदर पत्नी गंगाबाई हीस पुत्र झाल्यास एक लाख अर्पण करू असा नवस केला होता. नवस पूर्ण झाल्यामुळे पेशवे दरबाराकडून विविध रूपात हा नवस फेडला गेला.

# समर्थ रामदास स्वामी स्थापित ११ मारुतीराय कोणते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

समर्थ रामदास स्वामी यांनी महाराष्ट्रातील चाफळ आणि जवळच्या परिसरात सातारा, कराड, कोल्हापूरमध्ये ११ ठिकाणी मारुतीरायांच्या मूर्तींना स्थापित केले.

### कुठे-कुठे आहेत हे ११ मारुतीराय?

#### चाफळचे वीर मारुतीराय/ प्रताप मारुतीराय /भीममारुतीराय



सातारा, कराड, चिपळूणकडून जाणाऱ्या फाट्याजवळ उंब्रज गावाजवळ चाफळ येथे श्रीरामांच्या देऊळसमोर हात जोडून उभे दास मारुतीराय आणि त्याच देऊळच्या मागे प्रताप मारुतीरायांची कृष्णा नदीच्या काठावर चुना, वाळू, ताग यापासून बनविलेलीही मूर्ती स्थापिली आहे. ६ फुटी ही उंच मूर्ती श्रीरामांसमोर हात जोडून उभारलेली आहे. या मूर्तीचे नेत्र श्रीरामांच्या चरणांकडे स्थिर असल्याचे जाणवते. चाफळच्या श्रीरामांच्या देऊळमागे समर्थ रामदासांनी बांधलेले हे देऊळ आजतागायत आहे. या देऊळातील मारुतीरायांची मूर्ती भीमरूपी स्तोत्रामध्ये वर्णन केल्यासारखीच आहे. कमरेला सोन्याची कासोटी, किणकिणत घंटा, नेटका, सडपातळ डोळ्यांतून अग्निवर्षाव होताना जाणवणे. मूर्तीच्या पायाखाली दैत्य आहे. चाफळ येथे मारुतीच्या दोन मूर्तींची स्थापना रामदासांनी केली असून, दोन्ही मूर्तींचे रूप वेगवेगळे आहे.

#### माजगावचा मारुती




चाफळपासून ३ किलोमीटर लांब एका गावात पाषाणाच्या रूपात असलेल्या दगडाला समर्थांनी मारुतीरायांचे रूप दिले. ५ फुटांची मूर्ती चाफळच्या श्रीराम मंदिराकडे तोंड करून उभारलेली आहे. आधीच्या कौलारू, माती-विटांच्या देऊळाला जीर्णोद्धार करून नवे रूप देण्यात आले आहे.

#### शिंगणवाडीचे मारुतीराय/ खडीचा मारुतीराय / बालमारुतीराय

यास चाफळचा तिसरा मारुतीराय देखील म्हणतात. शिंगणवाडीची टेकडी चाफळपासून १ कि.मी. अंतरावर आहे. येथे रामघळ समर्थांच्या ध्यानाचे छोटेशे स्थळ आहे. येथे समर्थांनी मारुतीची छोटी सुबक मूर्तीची स्थापना केली. ४ फुटी उंचीची उत्तरेकडे तोंड केलेली ही मूर्ती जिच्या डाव्या हातात ध्वजासारखी वस्तू दिसण्यात येते. सर्व ११ मारुतीरायांच्या देऊळात हे सर्वांत लहान देऊळ आहे. आजूबाजूच्या परिसरात घनदाट झाडे आहेत. या देऊळाचा कळस तांबड्या रंगाने रंगविला आहे.



#### उंब्रजचे मारुतीराय/ मठातील मारुतीराय



चाफळचे २ आणि माजगावातील मारुतीरायांचे दर्शन करून परत उंब्रजला आल्यावर येथे जवळच ३ मारुतीराय आहेत. त्यातील हा एक उंब्रजचा मठातील मारुतीराय. अशीही आख्यायिका आहे की समर्थ चाफळवरून उंब्रजला दररोज स्नानासाठी येत असत. तेव्हा एकदा ते नदीत बुडताना त्यांना स्वयंहनुमानजींनीच वाचविले होते. समर्थांना उंब्रजमधील काही जमीन बक्षीस म्हणून मिळाली होती. तेथे समर्थांनी मारुतीरायांच्या देऊळची स्थापना करून चुना, वाळू आणि तागने निर्मित ही मारुतीरायांची देखणी मूर्ती आहे. या मूर्तीच्या पायाखाली दैत्य दिसतो.

#### मसूरचा मारुती



उंब्रजपासून १० कि. मी. असलेले मसूर येथे मारुतीरायांची स्थापना केली आहे. ५ फुटांची चुन्यापासून बनविलेली ही पूर्वाभिमुखी असलेली मारुतीरायांची मूर्ती अतिशय सौम्य प्रसन्न असलेली मूर्तीच्या मस्तकी मुकुट, गळ्यात माळ, जानवे, कमरेला मेखला, पायाखाली जंबुमाळी नावाचा राक्षस दिसतो. सहा दगडी खांबांवर देऊळाचे छत तोलून धरले आहे. मूर्तीच्या एका बाजूस शिवराम आणि दुसऱ्या बाजूस समर्थांचे चित्र काढलेले आहे. या देऊळाचा सभामंडप १३ फूट लांबी-रुंदीचा आहे.



#### शिराळ्याचे मारुतीराय



सांगली जिल्ह्यात नागांसाठी प्रसिद्ध असलेले हे गाव. शिराळे येथील एस.टी. स्टॅन्डजवळ हे मारुतीरायांचे देऊळ समर्थांनी स्थापित केले आहे. हे देऊळ देखणे असून मारुतीरायांची मूर्ती अतिशय भव्य आहे. ७ फुटी उंच ही मूर्ती चुन्याने बनविलेली आहे. ही मूर्ती उत्तराभिमुखी आहे. कटिवस्त्र आणि त्यातील गोंडा सुंदर असून कंबरपट्ट्यामध्ये घंटा बसविलेला आहे. मूर्तीच्या डोक्याचा उजव्या आणि डाव्या बाजूस झरोके आहेत. ज्यामधून सूर्योदय आणि सूर्यास्तावेळी मूर्तीच्या तोंडावर प्रकाश पडतो. देऊळाच्या प्रकाराला दक्षिण दिशेस दार आहे.

#### शहापूरच्या मारुती



कराड-मसूर रस्त्यावर १५ कि. मी.च्या अंतरावर मसूरपासून ३ कि.मी. अंतरापासून शहापूरच्या फाट्याहून १ कि. मी. लांब हे मारुतीरायांचे देऊळ आहे. ११ मारुतीरायांमधील मारुतीरायांमध्ये सर्वांत पहिले या मारुतीरायांची स्थापना केली आहे. या मारुतीरायांना चुन्याचा मारुतीराय देखील म्हटले जाते. या गावाच्या एका टोकावर नदीच्या काठाला मारुतीरायांचे देऊळ आहे. देऊळ आणि मारुतीची मूर्ती दोन्ही पूर्वाभिमुखी आहे. ७ फुटांची ही मूर्ती काहीशी उग्र दिसते. या मूर्तीच्या पुढील पितळी उत्सव मूर्ती आहे. मारुतीरायांच्या मूर्तीच्या मस्तकी गोंड्यांची टोपी आहे. येथून जवळच रांजण खिंड आहे. येथून २ दगडी रांजण दिसतात याचा जवळच्या टेकडीवर समर्थांचे वास्तव्य असते.

#### बहे बोरगावचा मारुती



सांगली जिल्ह्यातील वाळवे तालुक्यात बहे गावाजवळ बोरगावामुळे त्याला बेह बोरगाव म्हटले जाते. येथील मारुतीरायांच्या स्थापनेच्या मागे एक आख्यायिका आहे. ती रामायणाशी संलग्न आहे. रावणाचा वध करून श्रीराम अयोध्येला परतताना येथे बोरगावास वास्तव्यास होते. कृष्णा नदीला त्यावेळी वाळवंट होते. श्रीराम संध्यास्नान करत असताना कृष्णेला पूर येतो. तेव्हा मारुतीरायांनी आपले दोन्ही बाहू अडवून नदीच्या प्रवाहाला धरून ठेवले. ते प्रवाह दोन्ही बाजूस विभक्त झाले. त्यामधून एक बेट तयार झाले आणि या क्षेत्राला बहे असे नाव मिळाले.

या जागी मारुतीरायांचे समर्थांना मूर्तिरूपात दर्शन झाले नाही तेव्हा त्यांनी डोहात उडी मारून मारुतीरायांची मूर्ती त्या डोहातून काढून स्थापित केली. मारुतीरायांचे दोन्ही हात पाणी अडविण्याचा पावित्र्यात दिसून येतात. डोक्यावर मुकुट, हात दोन्ही मांड्यांचा बाजूला धरलेले. अशी ही भव्य मूर्ती दिसते. येथे जाण्यासाठी कृष्णा नदीच्या वरील पुलाच्या पश्चिमेकडील बंधाऱ्यावरून बेटावरून जावे लागते. नदीस पूर आल्यास येथे जाणे शक्य नसते.

#### मनपाडळेचा मारुती



मनपाडळे आणि पारगाव कोल्हापूर जिल्ह्यात पन्हाळगड -ज्योतिबाच्या परिसरात आहे. कोल्हापूर ते वडगाव वाठारपासून पुढे १४ कि. मी. अंतरावर हे मनपाडळे आहे. ११ मारुतीरायांपैकी सर्वांत दक्षिणे दिशेस असलेल्या या मारुतीरायांच्या देऊळाची स्थापना समर्थांनी केली. ५ फूट उंच असलेली ही साधी सुबक मूर्ती आणि देऊळ उत्तराभिमुखी आहे. मूर्तीजवळ दीड फुटी उंच कुबडी ठेवलेली आहे. जवळपास ओढ्या काठी सुंदरसे कौलारू देऊळ आहे. औरसचौरस असलेल्या गाभाऱ्याचे ह्या देऊळात नवीन बांधकाम केलेले सभामंडप देखील आहे.

#### पाडळीतील मारुतीराय



वारणेच्या खोऱ्यात असलेल्या मनपाडळे गावाजवळच पाडळी गावात मारुतीरायांची मूर्ती आहे.

#### पारगावाचा मारुतीराय



यालाच बाळमारुतीराय किंवा समर्थांच्या झोळीतील मारुतीराय असे म्हणतात. कराड-कोल्हापूर रस्त्यावर वाठार गावाजवळ नव्या पारगावाजवळ जुने पारगाव आहे त्यात ही मारुतीरायांची मूर्ती आहे. ११ मारुतीरायांपैकी शेवटची आणि सर्वांत लहान अशी ही मूर्ती सपाट दगडावर कोरलेली दीड फुटीची आहे. शेंदूर नसून केसांची शेंडी बांधलेली दिसते. मारुतीराया जणू डावीकडे धावत निघाल्याचा आविर्भावात ही कोरलेली आहे. मनपाडळे ते पारगाव अंतर ५ कि.मी.चे असून वळसा घेतलेला रस्ता आहे.

या ११ मारुतीरायांशिवाय समर्थांनी गोदावरी काठी, टाकळी येथे गोमय्याच्या मारुतीरायांची स्थापना केलेली आहे. एकदा तरी आपण ११ मारुतीरायांचे दर्शन करावे.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**